नियमित फौजदारी खटला नं. ३९७/२०२४

निशाणी– ४०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा जबाब.**

मी शपथेवर कथन करते की,

माझे नांवः– रोहिणी दिपक गुंजाळ ,

वयः– ३२ वर्षे, धंदाः– गृहिणी

राहणारः– तपोवन रोड, ढवण वस्ती, अहिल्यानगर

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–**

१. दि. २३/०४/२०२३ रोजी दुपारी १२.३० वा. सुमारास ढवणवस्ती, तपोवन रोड येथे माझे पती दिपक गुंजाळ रिक्षा घेऊन येत होते. त्यावेळी मी व माझ्या सासुबाई घरात हजर होतो. त्यावेळेस मला आरडा ओरडा केल्याचा आवाज ऐकु आल्यामुळे माझ्या सासुबाई लता गुंजाळ व मी घराबाहेर गेलो. त्यावेळेस मी पाहिले की, तेथे माझा पती दिपक यास अल्लाबक्ष दलवाई मारहाण करत होते. तसेच त्यांची मुले सोनु दलवाई आणि अरमान दलवाई हे देखिल माझ्या पतीस मारहाण करत होते. अरमान दलवाई याने माझ्या पतीच्या डोक्यात लाकडी दांडक्याने मारले. त्यामुळे माझ्या पतीच्या डोक्यातुन रक्त निघु लागले. त्यानंतर माझे सासरे अशोक गुंजाळ तेथे आले व त्यांनी माझ्या पतीस सरकारी दवाखाना अहिल्यानगर येथे उपचाराकरिता नेले. उपचारानंतर माझ्या पतीने तोफखाना पोलीस स्टेशन येथे आरोपीं विरुध्द तक्रार दिली. आरोपींनी ज्या लाकडी दांडक्याने माझ्या पतीस मारहाण केली ते दाखविल्यास मी ओळखु शकते. तसेच शबनम दलवाई व जावेद दलवाई या आरोपींनी देखिल माझ्या पतीस मारहाण केली होती. मी आरोपी क्र. १ ते ४ यांना पाहिल्यास त्यांना ओळखु शकते. ते आज रोजी गैरहजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. वाय. बी. नेमाने यांचेमार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे राहते घर लोकवस्तीमध्ये आहे व आजुबाजुला अनेक घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर ठिकाणी छोटी छोटी घरे व छोटे रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या आजुबाजुला राहणा-या लोकांच्या शेत जमीनी आहेत. सदर शेजारील लोक शेत जमीन करतात किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौजे ढवणवस्ती हे खेडेगांव प्रमाणे आहे व त्याठिकाणी राहणारे लोक पाणी तापविण्यासाठी व स्वयंपाक करण्यासाठी चुलीचा वापर करतात. मौजे ढवणवस्ती येथे राहणारे लोक चुलीचा वापर करण्यासाठी सरपन घराबाहेर ठेवतात किंवा कसे हे मला माहित नाही. मी सन २०१६ साली लग्न झाल्यापासुन ढवणवस्ती येथे राहते. मला ढवणवस्ती येथील परिसर फारसा परिचयाचा नाही. माझ्या घराशेजारी ढवण कुटूंबिय राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराशेजारी अमोल ठोंबे, अशोक चोभे, शितल बनकर, सचिन खोरकर,

गणेश ढवळे इत्यादी लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या जवळ काही अंतरावर ढवण वस्ती येथे इंडो आयरिश हे मोठे हॉस्पीटल आहे व त्याठिकाणी सर्व प्रकारच्या आजारावर उपचार केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी मी घरात असताना घराबाहेर काय घटना झाली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी येण्याकरिता मला आरोपींच्या घरासमोरुन छोटा रस्ता आहे व त्यावर लहान मुले खेळत असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती ढवणवस्तीमध्ये जोरात रिक्षा चालवतात म्हणुन वस्तीच्या लोकांनी त्यांच्या विरुध्द तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७/०२/२०२३ रोजी अरमान दलवाई याने माझ्या पतीच्या विरुध्द जोरात रिक्षा चालवतात म्हणुन तोफखाना पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र तक्रार दिली होती. मला सदर तक्रारीबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी शबनम दलवाई हिने माझे पती व सासरे यांचे विरुध्द तोफखाना पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्या विरुध्द पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने माझ्या पतीने आरोपीं विरुध्द फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी माझे पती आरोपींना मारण्यासाठी लाकुड घेऊन गेले होते व त्याठिकाणी हजर लोकांनी माझ्या पतीच्या हातातुन लाकुड काढुन घेतले व माझे पती झटापटीमध्ये खाली पडल्यामुळे त्यांना मार लागला होता. मी घटना लांबुन पाहिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी घटना पाहिल्यामुळे निश्चीत काय घटना घडली होती हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या घरावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे व त्यामध्ये संपूर्ण घटना चित्रीत केली गेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपींच्या दरम्यान कायम वाद होत असल्यामुळे आरोपींना अद्दल घडविण्यासाठी माझ्या पतीने आरोपीं विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष.

RESHMA SHAIKH

Digitally signed by RESHMA SHAIKH
DN: cn=RESHMA SHAIKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6947454, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.06.23 16:21:39 +0530

( श्रीमती आर. एम. शेख )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.

दि. २३/०६/२०२६.

अहमदनगर